**औरंगाबाद महानगरपालिकेकरिता केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर वाढीव(समांतर) पाणी पुरवठा योजना सार्वजनिक खाजगी सहभाग (Public Private Partenership- PPP) तत्वावर राबविण्यास मंजुरी देण्याबाबत**

------------------------------------------------------------

**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक युआयडी-२०१२/प्र.क्र. १२२/नवि-३३**

मंत्रालय, मुंबई- ४०००३२

दिनांक- २७ मे, २०१४

**वाचा:-** **१.** आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांचे पत्र क्रमांक मनपा/उअ/पापु/जास्था/१०४२/ २०१२, दिनांक १९ मार्च, २०१२.

**२.** औरंगाबाद महानगरपालिकेचा सर्व साधरण सभा ठराव क्र. ५५४, दि. १८.०८.२००९

**३.** औरंगाबाद महानगरपालिकेचा स्थायी समिती ठराव क्र. २१३, दि. २२.०३.२०११

**प्रस्तावना:-** केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या लहान व मध्यम शहरांकरिता पायाभूत सोयी-सुविधांचा विकास कार्यक्रम या उप-अभियानांतर्गत औरंगाबाद महानगरपालीकेकरिता रुपये ३५९.६७ कोटी किंमतीची समांतर पाणी पुरवठा योजना मंजूर झालेली आहे.

पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या कामात खाजगी संस्थाना सहभागी करून घेण्यासाठीच्या सूचना शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. नापापु १००१/प्र.क्र.५०३/पापु-२२, दिनांक १२ जून, २००१ अन्वये निर्गमित केल्या आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर पाणी पुरवठा योजना सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर राबविण्याचे निश्चित केले आहे. सदर योजना सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर राबविण्यासाठी निविदेची प्रक्रिया करण्यासाठी केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय (Department of Economical Affairs) यांनी इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट डेव्हलपमेंट फंड (IIPDF) योजनेंतर्गत एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या सहकार्याने क्रिसिल रिस्क अ‍ॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोलुशन्स लिमिटेड, (क्रिसिल) मुंबई यांची Transaction Advisor म्हणून नेमणूक केली होती. औरंगाबाद महानगरपालिकेने क्रिसिल च्या सहकार्याने या योजनेची निविदा प्रक्रिया केली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने सर्व साधारण सभेच्या ठराव क्र. ५५४, दि. १८.०८.२००९ अन्वये पाणीपुरवठा योजना सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) तत्वावर राबविण्यास मान्यता दिली आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेनंतर स्थायी समितीच्या विषय क्र. २१३, दिनांक २२.०३.२०११ अन्वये, समांतर पाणी पुरवठा

योजनेसाठी मे. सुभाष प्रोजेक्टस् व मार्केटिंग लिमिटेड ॲन्ड कन्सोर्शियम यांची कन्सेशनर म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६६ अ (ii) नुसार महानगरपालिका आपली कोणतीही वैधानिक जबाबदारी अथवा कर्तव्य शासन विहित करेल अशा अटी व शर्थीच्या अधीन राहून कोणत्याही अभिकरणामार्फत पार पाडू शकते.

आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी दिनांक १९ मार्च २०१२ रोजीच्या पत्राद्वारे औरंगाबाद महानगरपालिकेच्या समांतर पाणी पुरवठा योजनेस सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर राबविण्यास शासन मान्यता मिळण्याची विनंती केली आहे. सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर समांतर पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 66 अ (ii) नुसार परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यावर सर्वंकष विचारांती शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-** केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या लहान व मध्यम शहरांकरिता पायाभूत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रम या उप-अभियानांतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेकरिता मंजूर समांतर पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर करण्यास औरंगाबाद महानगरपालिकेला खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

१) या प्रकल्पासाठी भविष्यात औरंगाबाद महानगरपालिके मार्फत UIDSSMT मधील केंद्र व राज्य शासनाच्या सध्या मान्य असलेल्या वित्तीय आकृतीबंधानुसार देय अनुदानाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे अर्थ सहाय्य/ अनुदान उपलब्ध झाल्यास खाजगी भागीदारांसमवेत झालेल्या करारनाम्यात काहीही नमूद असले तरी अतिरिक्त अनुदानाच्या रक्कमेच्या प्रमाणात त्यांना देय असलेली वार्षिक रक्कम (Annuity Payment) त्या प्रमाणात कमी करण्यात येईल.

२) या कामी राज्यस्तरावरून कोणत्याही प्रकारचा पाठबळ मिळण्याचा करार (State Support Agreement) करण्यात येणार नाही.

३) महाराष्ट्र शासनाची कोणतीही मालमत्ता हस्तांतरित करता येणार नाही.

४) औरंगाबाद महानगरपालिकेची कोणतीही मालमत्ता विकासकास कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करण्याकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 79 नुसार सक्षम प्राधिक-यांची /-आवश्यकतेनुसार शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

५) सदर प्रकल्पासाठी UIDSSMT योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार अनुज्ञेय अनुदान प्राप्त होण्यासाठी आवश्यक सुधारणा करणे, त्रैमासिक प्रगती अहवाल सादर करणे, उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे तसेच केंद्र शासनाच्या संबंधित यंत्रणांकडे कागदपत्रे विहीत कालावधीत सादर करण्याची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेची राहील.

६) औरंगाबाद महानगरपालिकेने आर्थिक शिस्तीचे पालन करण्याची दक्षता घ्यावी. तसेच आस्थापना खर्च कमी करण्याकरिता व इतर अनावश्यक खर्च कमी व्हावा यासाठी योग्य ती उपाययोजना करावी.

७) या प्रकल्पांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांचा दर्जा व गुणवत्ता उत्कृष्ट राखली जाईल यासाठी सदर कामे सुरु असताना जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्ताण अभियानांतर्गत शासनाने नियुक्त केलेल्या स्वतंत्र पुनर्विलोकन व संनियंत्रण यंत्रणा (Independent Review & Monitoring Agency) मार्फत तृतीयपक्षी तांत्रिक तपासणी (Third Party Technical Inspection) वेळोवेळी करण्यात यावी.

८) औरंगाबाद महानगरपालिकेने सदर प्रकल्पांतर्गत पाणी पुरवठयासमवेत जल मापक प्रणाली (मीटरींग) चा वापर करणे अनिवार्य राहील.

**महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(सीमा ढमढेरे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
५. निवडनस्ती, नवि-३३